# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

'A' Grade NAAC Re-accredited (3rd Cycle)

दि. २७ फेब्रुवारी, २०२२

---

जळगाव दि.२७ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील जलतरण तलावाचे उदघाटन उद्या सोमवार, दि.२८ फेब्रुवारी २०२२ रोजी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा कुलपती श्री. भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्हयाचे पालक मंत्री श्री. गुलाबराव पाटील हे प्रमुख अतिथी असतील.

सोमवारी दुपारी २.१० वाजता राज्यपालांचे विद्यापीठात आगमन होईल. विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात व्यवस्थापन परिषद सदस्यां समवेत ते चर्चा करणार आहेत. त्यानंतर विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात बांधण्यात आलेल्या जलतरण तलावाचे उदघाटन श्री.कोश्यारी यांच्या हस्ते होणार आहे. पालक मंत्री श्री.गुलाबराव पाटील, प्रभारी कुलगुरु प्रा.ई.वायुनंदन यांची उपस्थिती असणार आहे. श्री.कोश्यारी यांचा कोणताही जाहीर कार्यक्रम विद्यापीठात होणार नाही.

बातमी क्र.२

जळगाव दि.२७ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राच्यावतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त सुप्रसिध्द कवी संजय चौधरी यांचे कवि आणि कविता या विषयावर ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून दैनिक दिव्य मराठीचे संपादक दीपक पटवे, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी एस.आर.गोहिल उपस्थित राहणार असून अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा.म.सु.पगारे राहतील. सकाळी १०.३० वाजता हे ऑनलाईन व्याख्यान होईल.

---

प्रति,

मा. संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमी प्रसिद्ध करावी, ही विनंती.

**आपला विश्वासू**

**(डॉ.सुनील पाटील)**

**जनसंपर्क अधिकारी**